# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक ५ | मुंबई | नोव्हेंबर, २०१६ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३) **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## ‘सेंट’ मेसेजेस

—सुहासिनी कीर्तिकर

दिवाळी अंकाची सुकडी खाल्ली. त्यातली विविधता अनुभवली. मग आली ‘हासत नाचत’ दिवाळी. आनंदाची, सुहृदांच्या भेटीची कारंजी उसळली. खाण्यापिण्याच्या चंगळी बरोबरच सुट्टीचा माहोल अधिक आनंददायी करण्यासाठी अनेकांनी बाहेरगावी जाऊन निसर्गही लुटला. आत्मीय संगतीत बेहोशी अनुभवली. आता नोव्हेंबरची थंडी जरा जरा सुखद गारवा घेऊन अवतरलीय. अशा वेळी पंचेंद्रियांनी केलेल्या दिवाळीच्या आनंदाची दुलई अजूनही दूर करावीशी वाटत नाही. हो, ना? म्हणून नोव्हेंबरच्या माझ्या संपादकीयात मी फक्त विनोदी चुटक्यांची पखरण करणार आहे. हे ‘चुटकुले’ वेचता वेचता तुमच्या आनंदाची ओटीही भरून जाईल. आनंदाने आनंदाला गुणले की काय होणार? आनंदी आनंदच गडे!

तर म्हणून हे काही विनोदी किस्से, काही विनोदी मासले. हां! मार्क ट्वेनने असं म्हटलं आहे की ‘जगात एकूण विनोद तीनशेच आहेत. तेच परत परत चेहरे बदलून येतात.’ म्हणूनच मी देत असलेले विनोदी किस्से तुम्हाला माहीत असण्याची शक्यता आहेच. तरीही ही शक्यता आनंदाचा भागाकार करणार नाही; याची खात्री आहे. मग सामील होताय ना या विनोदी चुटक्यात? चला तर मग…

* एक प्रेमवीर म्हणतो की, ‘आले रे बाबा अच्छे दिन! आज सकाळी पाच वाजता फोन करून मला सॉरी म्हणत होती. खूप रडत पण होती! म्हणत होती की, तू जसं म्हणशील तस्संच वागेन! प्लीज मला सोडून जाऊ नकोस. कुणाची गर्लफ्रेन्ड होती कुणास ठाऊक? पण बरं वाटलं…
* आज बायकोची मैत्रीण घरी आली होती. सुंदरच होती. आम्ही बराच वेळ गप्पा मारत होतो. स्वयंपाकघरात कुकरच्या दहा-बारा शिट्ट्या झाल्या. बायको ढिम्म बसूनच. शेवटी मी म्हटलं, ‘‘अगं, शिट्ट्या येताहेत. ती डाळ जळेल’ ती पटकन म्हणाली, ‘‘जळू देत जळली तर. पण तुमची डाळ शिजू देणार नाही.’’

मंडळी; अशा संशयी, जहांबाज बायकांवर तर अनेक विनोद तग धरून आहेत.

* एकदा नवरा बायकोच्या भांडणात बायकोने हातातली कातरी नवऱ्याच्या दिशेने फेकून मारली. नवरा घाबरून म्हणाला, ‘‘अगं अगं हे काय?’’ तर ती पटकन म्हणते कशी, ‘‘अहो काहीच नाही, हे ‘सर्जिकल स्ट्राइक’ आहे.’’
* अशा बायकांवर तर अनेक नवीन घटनांनी विनोदाला ऊतच येत असतो. त्यातलाच हा एक - मुक्तीवाली बाई म्हणते, ‘‘देवा, आम्हा स्त्रियांना मंदिरात प्रवेश का बरं नाही?’’ त्यावर बिचारा देव म्हणतो, ‘‘बाई, तुम्हाला ‘नवरदेव’ दिलाय ना मी? काय द्यायचा तो त्रास त्यालाच द्या. मला देऊ नका.’’
* ‘बायको’ हा ‘प्राणी’ निर्माण करताना देवाने म्हटले की चांगली आणि समजूतदार बायको जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात भेटेल.’ पण त्यानंतर देवाने जग गोलगोल बनविले. आता नवऱ्यांनो, बसा बोंबलत… जगाचा कोपरा शोधत.
* मुक्तीवाल्या बाईवर असा आणखी एक विनोद. आता पुरुषांनी चिंता करायची नाही. त्यांच्यामागे शनी लागणार नाही. कारण? कारण सध्या बायका शनीच्या मागे लागल्या आहेत.
* बायकांच्या हौसमौज करण्याच्या वृत्तीवर तर असंख्य विनोद आहेत. त्यातलीच ही एक ‘कॉमेंट’. कपाट उघडल्यावर बायकांसमोर दोन समस्या असतात. एक म्हणजे घालायला कपडे नाहीत अन् दुसरी म्हणजे… ठेवायला जागा पण नाही!
* बायकोची दहशत तर अनेक नवऱ्यांना! एकदा संभूराव सलूनमध्ये जातात. म्हणतात, ‘केस अगदी बारीक कापा.’ सलोनवाला विचारतो - ‘किती बारीक कापू?’ संभूरावांचे उत्तर - ‘बायकोच्या हातात येणार नाहीत इतके!’

बायकांचा सावधपणा, खरेदीची हौस, त्यांचे बंड वा आवेश हे विनोदाला खाद्य पुरवतात. तर पुरुषांचे दारूचे व्यसन विनोदाचा अखंड खुराकच ठरतो. हा किस्सा पहा -

* दारुड्या - ‘दारू प्यायल्यावर खोकला जातो का रं तात्या?’ यावर तात्याचं तत्परतेनं उत्तर - ‘म्हंजी? आरं दारूपायी माझं श्यात गेलं, घरदार गेलं, बायको गेली; तर मग तुझा खोकला का नाई जानार? आं??
* आता दुसरा किस्सा - डायनिंग हॉलमधील छत गळायला लागले म्हणून संभूरावांनी प्लंबरला बोलावले. प्लंबर : - ‘तुम्हाला कधी कळलं?’ या प्रश्नावर संभूराव उत्तरले, ‘‘काल रात्री माझ्या पुढ्यातलं सूप तीन तास झाले तरी संपेना तेव्हा….!!’’

अशा दारूबाजांचा आधार घेऊन काही गंमतशीर विनोद उभे राहतात.

* संभूराव : तो घुंगरांचा आवाज एकदा का कानावर पडला की माझी पावलं आपोआप तिकडे वळतात. बंबूराव : - ‘काय हे? दारूच्या नशेत हे देखील? अरे, बरं दिसतं का वयात?’ संभूराव : - ‘त्यात वाईट काय? उन्हाळ्यात आजही चरकावरच्या उसाच्या ताज्या रसाला तोड नाही रे!

दारूबाज तसेच प्राध्यापक मंडळीही विनोदच विनोद निर्माण करतात.

* नवीनच नोकरीत लागलेला प्राध्यापक आपल्या सहकाऱ्याला म्हणाला, ‘मी मन लावून शिकवीत होतो. पण काही जण वर्ग सोडून गेले रे! का बरं?’’ सहकारी चुचकारीत म्हणाला, ‘‘नवीन आहेस तू अजून. मनावर घेऊ नकोस. त्या काहींना झोपेत चालायची सवय आहे!’’
* एक प्राध्यापक वर्गात म्हणाले, ‘मुलांनो, काल मी शिकवले ते लक्षात आहे ना? माझ्या कालच्यात आणि आजच्यात काय फरक आहे? सांगाल?’’ एक विद्यार्थी तत्परतेने उठून म्हणाला, ‘‘हो! काल तुम्ही बॉटम थिअरी शिकवली. पण काल तुमची टाय गळ्याला बांधली होती. आज ती पॅण्टशी कमरेला बांधली आहे.’’

असा वात्रटपणा मुलांमध्येच असतो असे नाही. तो सगळ्यांतच असतो. नमुना पहायचाय?-

* एक कोल्हापूरकर कट्ट्यावर तंबाखू मळत बसलेला असतो. एक कार त्याच्याजवळ येऊन थांबते. त्यातला माणूस विचारतो, ‘‘दादा, आम्हाला बिंदू चौकात जायचं आहे.’’ कोल्हापूरकर म्हणतो, ‘मग जा की खुळ्या. अख्ख्या गावाला कशाला सांगत फिरायलेस?’’
* शहरातली मुलगी लग्न करून खेड्यात गेली नांदायला. सकाळी सकाळी तिची सासू म्हणाली, ‘जा, म्हशीला खायला घाल जा.’’ सून तत्परतेने गोठ्यात गेली. म्हशीच्या तोंडाला फेस पाहून परत आली. सासूने विचारले, ‘‘काय गं, म्हशीला चारा टाकलास?’’ सून म्हणाली, ‘‘ती अजून ब्रश करत्येय!’’

काही विनोद तत्कालीन प्रसंगांवर, घटनांवर आधारित असतात. एक प्रकारचे भाष्यच ते. हा पहा तसाच एक नमुना!

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

- पाचशे, हजाराच्या नोटा रातोरात बाद झाल्यावर एका व्हॉटस्‌ॲपवरील शेरा- ‘आता ‘काहे दिया परदेस’मधील निशा उशीतल्या ऐंशी लाखांचे काय करेल?’
- मुंबईकरांना पाणीबचतीचा उपाय - ‘जन्मतारीख सम असणाऱ्यांनी सोमवार, बुधवार, शुक्रवारी आंघोळ करायची. विषम असणाऱ्यांनी मंगळ, गुरू, शनिवारी आंघोळ करायची. रविवारी आंघोळीला सुट्टी!’
- ‘इलेक्शन’ वेळचा एक नारा त्यातलाच. पहा -

  जो मुझे वोट देगा, उसको पिलाऊंगा मैं बोर्नव्हिटा...

  जो मुझे वोट नही देगा, उसको फेकके मारूंगा मैं दगडविटा...
- संभूराव बंबूरावांना विचारतात, ‘सेंट मेसेज’ म्हणजे काय?

  बंबूराव म्हणतात, ‘मेसेजला ‘सेंट’ लावलेला असतो ना? म्हणजे सुगंधित मेसेज.’

मंडळी, असले अफलातून ‘सेंट’ मेजेस मी आजच्या लेखातून तुम्हाला ‘सेंट’ केले आहेत. बघा बरं ते ‘सुगंधित’ किंवा हास्यकारी आहेत का? असतील तर हसा! नसतील तरीही दिवाळीचा थकवा घालवायला कीं काय; वाचाच बरं का.

✳

# PRESSURE!

**- Prajakta Rajpurkar**

Wait to complete assignment until the end. I think many of us (may be not all of us) have this habit since school days. And apparently, I am not getting rid of it that easily. I had said, that I would write for My ex- school Diwali Ank in Marathi. But as usual because it is so late, I am writing in English and asking My school friend to translate it in Marathi. The pressure is on!

When we were young, all we did was play, study and may be 1 hour TV and Radio in the whole day. Now I see children going to school, playing video games, going to tuition/ classes, Swimming or sports lessons, Art lessons, Music lessons, the list is endless. And it is not just here in America, but I see this everywhere including India. India didn't get a lot of medals in Olympics as per the expectations of the crowd. So, they have to go through this Pressure too. We only had to study and do well in the exams. Now those "we" or us – want our children to become all rounders. Parent Pressure!

Because we are getting them involved in so many activities, they don't have enough time to eat and sleep. Which will ultimately start affecting their health too. A child needs 9-10 hours of sleep, at least. But they won't get it because we are pushing them. I only saw people studying 16-20 hours of day from year 8 to completion of Engineering or Medical. Now, we are doing it on the name of sports or relaxation. Where is relaxation in commuting from one place to another to do activities? Or to loose sleep over it?

Then, once they are High School or College age, the children will have Peer Pressure. And that's another Pressure that they must deal with. Peer pressure to do Drugs, Alcoholism, Girlfriend/ boy friend, Sex, etc. How to say NO and stay away from that? What counseling options are available? Why at this age too, the children have to go through Depression Anxiety Aggression? Why they can't turn to their parents for help or with their issues?

After that comes the major part of Work Pressure!! Which probably will stay with you for 40-45 years!!! The pressure to earn money, get a better paid job, then to keep that job, to move up the ladder, so that they can make more money?? And all this because – for the family, so that I can pay for all those extra tuitions, sports/ art/ music lessons.

Not enough sleep, wrong or irregular eating habits, stress and tension – carry all that for years and then we get another Pressure!! Blood Pressure ( High or Low).

Where are those days gone when what people say didn't matter, and we could do or buy what we could afford. Not caring for anything other than that. Where is the fun gone in simple living? And that's what we try to learn from Chetan Bhagat and pay exorbitant fees to attend his seminars and get even more pressure!!! It's kind of a loop.

What is the solution to this PRESSURE? May be we or our next generation can find it or strive to balance it or reduce it.

✳

# श्रीमती शैला केशवराव साठे जन्मशताब्दी

(जन्म: २४ जुलै १९१६ - मृत्यू: २० जुलै २००८)



महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेतील सर्वांत जुन्या, पहिल्या महिला कर्मचारी श्रीमती शैला केशवराव साठे (पूर्वाश्रमीच्या कु. शैलबाला भगवंतराव आगासकर) यांची जन्मशताब्दी नुकतीच साजरी झाली.

शैलाताई साठे यांनी १९३६ मध्ये मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एम. ए. ची पदवी घेतली आणि त्यानंतर लगेच त्यांनी त्या वेळच्या बॉम्बे प्रॉव्हिन्शियल स्टेट बँकेत नोकरी सुरू केली. या बँकेतील त्या पहिल्या महिला कर्मचारी होत्या. इथे नोकरी करत असतानाच त्यांनी बँकिंग क्षेत्रातील सी. ए. आय. आय. बी. ही उच्च पदवी प्राप्त केली. या बँकेचे रूपांतर पुढे आजच्या महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेत झाले. शैलाताई आपल्या अंगच्या गुणांनी आणि हुशारीमुळे अधिकाधिक वरच्या पदांवर चढत गेल्या आणि अखेरीस वयोमानानुसार ‘चीफ अकाउंटंट’ या पदावरून निवृत्त झाल्या.

त्यांचा स्वभाव मनमिळाऊ आणि खेळकर असल्यामुळे त्या सहकाऱ्यांना फार आवडत असत. प्रामाणिक वर्तन हा त्यांचा आणखी एक विशेष. बँकेतील इतर महिला कर्मचाऱ्यांच्या सहली त्या आयोजित करत असत व भारतदर्शन घडवून आणत असत. त्यांच्याबरोबर काम केलेले सहकारी आजही त्यांची अतिशय प्रेमाने आठवण काढतात. त्यांच्या स्मृतीला नम्र अभिवादन.

**-मृदुला प्रभुराम जोशी**

## पाठारे प्रभु सोशल समाजाचा कनकाईदेवी उत्सव

सोशल समाजाने गुरुवार दि. ६ ऑक्टोबर २०१६ रोजी ललितापंचमीच्या शुभदिनी पार्ल्याच्या राजपुरिया हॉलमध्ये कनकाईदेवीच्या नवरात्रोत्सवात पाठारे प्रभु कलाकारांसमवेत संगीत-नृत्याचा रंगारंग कार्यक्रम सादर केला. प्रारंभी समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले आणि संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन व निवेदन अतिशय भावपूर्ण व समयोचित शब्दात केले. गणेशवंदनपर नृत्याने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला व त्यानंतर सरस्वतीवंदनेचेही नृत्य झाले. देवीच्या गोंधळाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात एकूण ७ नृत्याविष्कार सादर झाले. त्यात एक नृत्याविष्कार बाल कलाकारांचाही होता. नृत्यरचना सौ. मयुरा नायक यांची होती.

संगीताच्या कार्यक्रमात एकूण १० भगिनींनी देवीच्या स्तवनाची व ईश्वरभक्तीची गीते सादर केली. त्यांना संवादिनीवर श्री. वसंत मोरे यांनी तर; तबल्यावर श्री. अवधूत चौबळ यांनी साथ दिली. दीड तासाचा हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. उपाध्यक्षा श्रीमती स्वाती जयकर यांनी आभारप्रदर्शन केले. श्री. किशोर जयकर व श्री. नंदकुमार विजयकर यांनी छायाचित्रणाची कामगिरी बजावली.

कनकाई ट्रस्टतर्फे समाजाच्या पदाधिकाऱ्यांपैकी पुरुष वर्गाला म्हणजे विश्वस्त श्री. माधव जयकर, श्री. अजित तळपदे आणि संयुक्त चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तर स्त्री पदाधिकाऱ्यांना म्हणजे अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे, उपाध्यक्षा श्रीमती स्वाती जयकर आणि संयुक्त चिटणीस सौ. नीता सेंजित यांना कनकाईदेवीचा प्रसाद म्हणून शेले देऊन सन्मानित करण्यात आले. श्री. तुषार कीर्तिकर व सौ. सुजाता कीर्तिकर यांच्यातर्फे आणि कनकाई ट्रस्टतर्फे सर्व लहान थोर कलाकारांना भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. नंतर महाप्रसाद म्हणून उपस्थितांना कीर्तिकर कुटुंबीयांतर्फे भोजनाचा प्रसाद दिला गेला. या कार्यक्रमाला राजपुरिया हॉल तुडुंब भरला होता. तसेच बाहेरील प्रांगणात मोठ्या स्क्रीनची व्यवस्था असल्याने तेथेही रसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

या कार्यक्रमात सहभागी झालेले कलाकार :-

**संगीत :** श्रीमती मधु धुरंधर, सौ. वीणा अजिंक्य, डॉ. सौ. वैजयंती अजिंक्य, सौ. अक्षदा तळपदे, सौ. रजनी कोठारे, सौ. योगिता नवलकर, सौ. स्नेहा राणे, सौ. सुहास विजयकर, सौ. रॉनिका विजयकर व श्रीमती क्षमा कोठारे.

**नृत्य :** सौ. मयुरा नायक, सौ. जान्हवी कीर्तिकर, सौ. मिहिका नवलकर, सौ. नीता सेंजित, सौ. पल्लवी कोठारे, सौ. अनिला धैर्यवान, सौ. निवेदिता धैर्यवान - सत्तूर, सौ. अनुषा आगासकर, सौ. पूजा कोठारे, सौ. वैदेही राणे, सौ. संजना कोठारे

**बाल कलाकार :** विवान आगासकर, पर्जन्य कीर्तिकर, यथार्थ कोठारे, वरुण राणे, प्रणाली राणे, अश्विक विजयकर, किमया कोठारे

लेख क्रमांक ११

## दूरदेशातून-

# हिंदुस्थानचे बाह्यरूप

-सुजन राणे
panditsujanrane@yahoo.com

कोणत्याही देशाच्या इमेजने, त्या देशाची संस्कृती, आर्थिक प्रगती व एकंदर राहणीमान याची पारख बाहेरच्या जगाला होत असते. या संदर्भात नुकत्याच कुटुंबासहित केलेल्या माझ्या चीन व जपानच्या दौऱ्याच्या बाबतीत माझे विचार मांडावेसे वाटतात. प्रथमदर्शनी, या देशातली आर्थिक प्रगती डोळे दिपून जाण्यासारखी आहे यात शंका नाही. बेजिंग व शांघाय इथल्या उंच उंच इमारती, रस्ते, बुलेट ट्रेन व एकंदर स्वच्छता: वाखाण्यासारखी आहे. Great Wall of China पाहण्यासाठी पर्यटकांसाठी Ropewayची व्यवस्था, जवळच स्वच्छ उपाहारगृहांची रांग, हे सर्व स्तुत्य वाटते. तसंच Tiananmen Squareचा अवाढव्य परिसर पाहण्याजोगा होता, जिथे कम्युनिस्ट सरकारपासून स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांची काही वर्षांपूर्वी निर्दयपणे कत्तल करण्यात आली होती. तिथलं माओ त्से तुंगच भव्य चित्र व आजूबाजूची लष्करी शिस्त मनात भरण्यासारखी होती. माओ त्से तुंगने चीनमध्ये कम्युनिस्ट सरकारची मुहूर्तमेढ १९४९ रोवली व ती त्यांच्या मरणापर्यंत म्हणजे १९७६ पर्यंत चांगली भक्कम केली. १५ एप्रिल ते ४ जून १९८९ या दीडेक महिन्यात Tiananmen Square मध्ये विद्यार्थ्यांनी दडपशाही विरुद्ध लोकशाही या मूल्यांकरिता मोठ्या प्रमाणात चळवळ केली. पण ती चळवळ कम्युनिस्ट चिनी सरकारने रणगाड्यांच्या खाली चिरडून आणि बंदुकीच्या गोळ्यांनी लोकांना ठार मारून उलथून लावली. त्यात त्यांना यश आलं आणि त्यांच्या धेयाप्रमाणे आर्थिक प्रगती चालू राहिली. आज चीनच्या प्रगतीचं उदाहरण जगापुढे ठेवलं जातं. एका बाजूला आर्थिक प्रगती तर दुसऱ्या बाजूला मानसिक स्वातंत्र्य यात लढा चालू आहे असं म्हणायला हरकत नाही.

चीनचा दौरा आटपून आमचे पाय जपानच्या मुख्य शहरी म्हणजे टोकियोकडे वळले. विमानतळावर उतरल्यावर हसतमुखाने आमचे स्वागत झाले. त्याचवेळी सामान्य चिनी व जपानी माणसातला फरक जाणवला. अगदी, हॉटेलच्या रिसेप्शन काऊंटरजवळसुद्धा लोकं कमालीची विनयशील वाटली. प्रत्येकवेळी वाकून आमची विचारपूस करत होती. जिथे आम्ही राहत होतो त्या Conrad Hotelच्या ३६व्या मजल्याहून टोकियो शहराचं चित्र अवर्णनीय दिसत होतं. तिथले एकमेकांवरचे फ्लायओव्हर, वळणदार रस्ते व रेल्वे मार्ग पाहून, मनात कुठंतरी असं वाटलं की आपली मुंबई अशी का नसावी? दुसऱ्या दिवशी आम्ही Volcano साठी प्रसिद्ध असलेला Mount Fuji Ropeways पाहायला गेलो. त्या भागात डोंगरात जवळच एक तळं होतं आणि असं वाटलं की त्यातील शांत पाणी जणू काय जपानी लोकांची शांत आणि आनंदी वृत्ती प्रतिबिंबीत करत होतं. Conrad Hotel मधली एक हिंदी जाणणारी waitress नीलिमावर (माझ्या बायकोवर) येवढी खूष झाली की तिने नीलिमाला अक्षरशः मिठी मारली, कारण नीलिमाने तिच्याशी हिंदीत संभाषण करायला सुरवात केली. इथले लोक अत्यंत health-conscious वाटले, कारण पुष्कळसे तोंडावर mask लावून फिरत होते. सूट व हातमोजे घातलेले टॅक्सी ड्रायव्हर्स पाहून जपानी लोकांचं कौतुक वाटलं. मग अशा शांत लोकांवर हिरोशिमा व नागासाकी या शहरी १९४५ साली दोन अणुबॉम्ब टाकून ३० लोकांचा जीव का घेण्यात आला असा प्रश्न भेडसावतो. तो एक इतिहासाचा भाग होता असं बोलावं लागेल कारण इतिहास सारखा पुढे जात असतो.

जिथे जिथे आम्ही जात होतो तिथे तिथे आम्हाला असं वाटायचं की भारत इतका जुना देश असून तिथे अशी सुधारणा का झाली नाही. वास्तविक जपान १९४५ साली उध्वस्त झाला आणि चीन १९४९ साली कम्युनिस्ट राजवटीखाली आला, तर भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं, म्हणजे ह्या तिन्ही देशांच्या प्रगतीला जवळजवळ एकाच वेळी सुरवात झाली, तरी आपण येवढे मागे का राहिलो? दुसऱ्या महायुद्धानंतरच्या जपानच्या प्रगतीची काही ठोस कारणं आहेत, ती म्हणजे मशीनगन बनवणारे कारखाने शिवणयंत्रे बनवायला लागले, लढाईला लागणारी उपकरणं बनवणारे कारखाने कॅमेरे आणि दुर्बिणी बनवू लागले, तर जपानच्या जीएनपीच्या १% त्यांच्या सैन्यावर खर्च करण्यात आला. जपानचे कारखाने गाड्या आणि संगणक बनवून निर्यात करू लागले. त्यामुळे त्यांचा पुष्कळसा खर्च त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी होऊ लागला. टोयोटा, होंडा, मित्सुबिशी आणि निस्सानसारख्या गाड्या जपान जगभर विकू लागला. जपानी उद्योगपती बँकांच्याकडून मोठमोठाली कर्ज घेऊन त्यांचे धंदे वाढवू लागले. चीनच्या बाबतीत बोलायचं तर चीनने आपले दरवाजे परकीयांना गुंतवणुकीसाठी १९९० नंतर फार मोठ्या प्रमाणात खुले केले. तसंच त्याच्या कम्युनिस्ट सरकारने आतून जरी सर्व ठिकाणी नियंत्रणं ठेवली होती तरी बाहेरून लोकशाहीचीच तंत्र अनुसरली होती. तेव्हा आर्थिकदृष्ट्या चीनची झपाट्याने प्रगती झाली. आपल्यासारखी सामान्य माणसं जे आपल्या डोळ्याला एखाद्या देशातल्या रोजचा जीवनाचा दर्जा दिसतो त्यावरून त्या देशाच्या प्रगतीचं अनुमान काढतो. चीनमधलं रोजचं जीवन समृद्ध दिसलं, लोकं तंदुरुस्त व चांगले कपडे घालून फिरताना दिसले. तसंच रस्त्यावर चिनी व बाहेरून आलेल्या गाड्यांचा सुळसुळाट दिसला, मध्यमवर्गीयांनी खाद्यगृह भरलेली दिसत होती. बेजिंग आणि शांघायमध्ये उंच उंच इमारतीत लोकं राहताना दिसत होती. भारतातल्या शहरात उंच उंच इमारतीत लोकं राहतात, पण इमारतीच्या बाहेर रस्ते आणि फूटपाथची अवस्था केविलवाणी असते. रस्त्याचे मोडलेले डिव्हायडर, त्याच्यावर झोपडपट्टीतल्या लोकांचे वाळत घातलेले कपडे, रस्त्याच्या कोपऱ्यात कचऱ्याचे ढीग, रस्त्यावर कागदाचे तुकडे, ट्रॅफिक लाईटजवळ भिकाऱ्यांचा सुळसुळाट आणि खांबावर राजकीय पुढाऱ्यांचे ठिकठिकाणी फोटो, तसंच खाद्यपदार्थाच्या चार-चाकाच्या गाड्या, हे सर्व दृश्य किळसवाणं वाटतं. dress-code हा concept जवळजवळ नाहीच असं वाटतं. खुद्द लोकसभेत आणि राज्यसभेत आपण निवडून आणलेले पुढारी वाटेल ते कपडे घालून येतात. शेरवानी व चुडीदार किंवा राजस्थानी पद्धतीचे त्यांनी सर्वांनी कपडे घातले तर एक प्रकारची शिस्त दिसून येईल. विमानतळावर, रेल्वे स्टेशनवर, सरकारी दफ्तरात, टॅक्सी व रिक्षा चालकांनी स्वच्छ dress-codeचं पालन केलं तर पब्लिकमध्ये शिस्त नक्कीच दिसून येईल. सर्वसाधारण नागरिक आपल्या हडकुळ्या आणि पोटाचे नगारे झालेल्या पोलिसांना घाबरत नाही तर कायदा मोडणारे कसे घाबरतील? काही ठिकाणी पोलीस चौक्या ॲसबेसटॉस व पत्र्याच्या शेडखाली, तर कोर्टाच्या बाहेर जुन्या पाट्या व केसीस वर्षानुवर्षे चालत राहतात मग भ्रष्टाचारला आळा कसा बसणार? अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था याचं पालन कसं होणार हा प्रश्न उद्भवतो. हे चित्र बदललं पाहिजे, कारण बाहेरच्याला आपल्या देशात गुंतवणूक करायची असेल तर तो ही परिस्थिती बघून कचरतो, तो आपली तुलना चीन व जपानबरोबर करायला लागतो. परदेशी थेट गुंतवणूकीखाली गुंतवणूक झाली आहे पण ती ज्या प्रमाणात व्हावी तेवढी झालेली नाही. आपले पुढारी परदेशात जाऊन येतात. पण त्या देशातील परिस्थितीचं अनुकरण आपल्या देशात का करत नाहीत? आपल्याला प्रगती लवकर पाहिजे असेल तर हे सर्व लवकरात लवकर बदललं पाहिजे. आपली मनोवृत्ती (Mind-set) बदलली पाहिजे तरच पुढच्या पिढीला त्याची फळं मिळतील. माणसाला चांगली स्वप्न पडायला लागली की तो त्या दिशेने धडपड करायला लागतो हा मनुष्यप्राण्याचा स्वभाव आहे. बघूया येणाऱ्या काळात आपण काय साध्य करू शकतो.

*

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



आलटून पालटून-

# भावंड हरवलंय

चारुदत्त धैर्यवान

साधारण पाहता भारतीय किंवा इतर देशातील लोक त्यांच्या चार ते पाच पिढ्यांचे वंशवेल काही प्रमाणात अचूक शोधून संग्रही राहतील ह्या स्वरूपात मांडू शकतात. माझ्या पाहण्यात आलेल्या काही वंशवेलींचा सखोल विचार आणि थोडा अभ्यास मी केला आणि त्याच बरोबर माझ्या नातेमंडळींच्या कुटुंबातील गेल्या चार पिढ्यांतील जोडप्यांची संतती ह्यांचे गुणांकन मांडले. त्यात जो मुख्य बदल जाणवला तो म्हणजे भावंडातील झालेली घट. साल १९४७ पूर्वीची पिढी ते अगदी आजपर्यंतचा जर सारांश पाहिला तर एका Couple प्रमाणे संतती घट सरासरी ७० ते ८० टक्के झालेली दिसते. त्याकाळी एका घरात किमान ७/८ भावंडं असत आणि आता घरटी जेमतेम एकच मूल असतं. त्यामुळे आजच्या मुलाला भावंड असे कुणीही नाही.

ह्या सत्यपरिस्थितीचा विचार केला तर ह्या पिढीतील जी मुलं आहेत त्यांच्यात आणि त्यांच्या दोन पिढी आधीच्या वृद्ध व्यक्तींच्यात एक असमान अशी विचारांची दरी निर्माण झालेली आढळते. त्यात भर पडली आहे ती प्रगतशील आणि परिपक्व झालेल्या तंत्रज्ञानाची. अनेक घरात आपल्याला पहायला मिळतं की घरातील प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या तरी आधुनिक उपकरणाशी नाते जुळवून आपल्याच विश्वात गुंतलेली असते. ह्यामुळे घरातील वातावरण अक्षरशः निसंवाद बनून गेलेलं असतं आणि मग घराघरातून ऐकू येतात ते फक्त दूरदर्शन संचावरील वायफळ संवाद. झालेल्या ह्या जागतीकरणाने जणू काही घरातले घरपण गिळंकृत झाले आहे. ह्यात मुख्यता घुसमट होते आहे ती म्हणजे घरातील वृद्ध व्यक्तींची. ज्या त्यांच्या बालपणात आपल्याच घरातल्या पाच ते सहा भावंडांसोबत खेळण्यात मग्न असायचे आणि त्याकाळच्या मोठ्या घरात असायचा तो फक्त घरातील ह्या चिल्या-पिल्यांचा गोंगाट. त्याकाळी टेलीविजन / इंटरनेट वगैरे नसायचे; पण करमणूक आणि अभ्यास ह्यात त्यांचा वेळ व्यतीत होत असे. त्यात घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीचे जेव्हा पाऊल घरात पडायचे तेव्हा लगेच शिस्तबद्धतादेखील दिसे. ह्या स्वरूपाच्या वातावरणात लहानाचे मोठे झालेले हे आजचे आजी/आजोबा आपल्या नातवंडाला घरातील कोपऱ्यात स्मार्ट फोन घेऊन एकटाच हसताना पाहून गडबडून जात आहेत. त्यांना अनेक प्रश्न भेडसावू लागले आहेत. आपल्या नातू/नातीला वेड तर नाही ना लागले? की कुणी भूतपिशाच्याने झपाटले तर नाही? असे ना ना विचारांचे जाळेच जणू त्यांच्या डोक्यात बनून गेलेले आहे.

पण खरी परिस्थिती अशी आहे की काळानुरूप जो बदल घडला गेला त्यामुळे ही आजची पिढी स्वतःच्या घरात भावंड गमावून बसली आहे. त्याचबरोबर घराचे स्वरूप सध्या प्रगत झाले आहे ते Apartment पद्धतीत, जिथे शेजारी असून देखील कधी दिसण्याचा योग येत नाही. त्यामुळे आजच्या ह्या मुलांना समवयीन सवंगडीदेखील उपलब्ध नाहीत. निदान त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्या बालपणी शेजारील राहणाऱ्या मुलांसोबत खेळत आपले बालपण व्यतीत केलेले असेलच पण सध्याच्या मुलांना त्यांचा सवंगडी सापडत आहे तो Online एखाद्या Social Network App वर. मग तो त्याच्या मित्र किंवा कझिनसोबत खेळत किंवा गप्पा मारत असतो ही त्याची आजच्या काळातील भावंड. ह्यात ह्या बाळांचा काय दोष? हा दोष खऱ्या अर्थी आहे तो पारंपारिक रित्या घडत गेलेली संततीमधील घट ज्यामुळे घरातील भावंड नाहीसे झालेले आहे. तसंच प्रत्येकजण आपल्या व्यवसाय आणि नोकरीमुळे दिवसातील १४ ते १६ तास कायम कामात गढून गेलेला. जो सकाळी उठून थेट ऑफीसमध्ये पोहोचतो अन् संध्याकाळी घरी परतल्यावर आपला LapTop Deve Cell घेऊन त्याच्या परदेशातील Colleague / Customer / Supplier बरोबर TeleCall वर कंपनीच्याच कामात परत गर्क झालेला. त्यात एखादी आठवड्याची सुट्टी मिळाली की घरात लागणाऱ्या गरजेच्या गोष्टी आणायला धावायचे आणि मग त्यात थोडावेळ मिळाला की नवरा + बायको + मूल एखादा सिनेमा आणि Dine-Out उरकून घरी परतायचे. त्यात आजी/आजोबा मात्र वयोमानामुळे बऱ्याच वेळी घरीच राहणं आणि जेवणं पसंत करतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे बाहेरच्या वातावरणातला झालेला Westernised बदल त्यांना सहन होणं कठीण बनून गेलाय.

हा झाला एका घरातला नाहीसा होत जाणारा ओलावा. त्याचबरोबर आणखी एक बाजू आहे ती म्हणजे सध्याच्या आई-बाबांच्या भावंडांची. सर्वांच्या व्यस्त दिनक्रमातून एकमेकांशी भेट होणं हा तर दुर्मीळ सुवर्णयोग बनलाय. ज्यामुळे काही प्रमाणात नाराजी जाणवते आणि सुरु होत जात आहे ती धुसफूस. त्यातून बरीच मंडळी ही धुसफूस कमी करण्याच्या हेतूने वेगवेगळ्या कारणाने संपर्क आणि भेटीगाठी जुळवून आणतातदेखील. पण ती अगदी परिपूर्ण होत नाही आणि एखादी पोकळी कुठे ना कुठे तरी राहतेच. त्याच पोकळीमध्ये कधी हवा भरली जाते हे कळत नाही आणि मग ती एवढी फुगत जाते की सरते शेवटी येऊन पोहचते ती वडिलोपार्जित संपत्तीच्या वादांवर. तसं पाहता हे वाद सामंजस्याने सोडवतादेखील येऊ शकतात. पण प्रत्येक घरात सध्या राहिला आहे तो फक्त एकलकोंडेपणा. त्यामुळे जो तो विचार करतो फक्त इन मीन तीन जणांचा. आता ह्याचेदेखील खरे कारण म्हणजे पारंपारिकरित्या घडत गेलेली संततीमधील घट आणि त्यामुळे घटत जाणारा परिवार. ह्या कारणाने अक्षरशः भावा-भावांच्यात वाढलेले वैरत्वही पहायला मिळत आहे.

थोडक्यात काय; तर भावंड नाहीसे होत गेल्याने एकमेकांच्यात पूर्वीच्या काळी असणारे प्रेम भावी काळात पहायला मिळेलच ह्याची खात्री आज देता येणे कठीण आहे. पारिवारिक नातेसंबंध जपणे काय असते हे कदाचित पुढील पिढीला समजणेदेखील दुरापास्त होईल. त्याचबरोबर पारंपारिकरित्या घडत गेलेली संततीमधील घट ह्यापुढे कदाचित मी राजा अन् तू राणी पर्यंतच मर्यादित राहील. कदाचित जोडपी कुत्रा, मांजर किंवा तत्सम प्राणी दत्तक घेतील आणि त्यांच्या पुढील पिढीचे रुपांतर जनावरात घडून जाईल. कदाचित हेच विश्व निर्मात्याचे विधिलिखित असावे. आज मानव जणू जनावरासारखा वागू लागलाय. चाकरमानी करतोय गधामजुरी, गुंड बनलाय कुत्री-मांजरासारखा वैरी, नेतेमंडळी स्वतःला समजू लागले वाघ आणि शेर, पत्रकार करताहेत कोल्हेगिरी, पोर-बाळं जात आहेत शाळा-कॉलेजात मेंढरावाणी.

आज हरवलंय ते भावंड कदाचित पुढील पिढी जनावरात रुपांतरीत झाल्यावर तरी ते भावंड नक्की दिसेल. आज घरात तुम्ही जर कुत्रा आणि मांजर पाळले तर ती दोघं अगदी मजेत खेळताना दिसतदेखील आहेत आणि आपण देखील Pet Lovers बनून त्यांचे खेळ Video Shoot करतो आणि Face Book वर Post करतो.

हेच प्राणी भावी काळात त्यांच्या पुढील पिढ्यांना भावंड मिळवून देतील अन् अशा रीतीने मनुष्य जीवनाचा बदल घडून जाईल.

तेव्हा येणाऱ्या भविष्यकाळात काय घडेल ते माहीत नाही. पण आजच्या काळात तरी जी काही नाती-गोती आहेत ती तरी टिकून राहोत. आपल्या एकुलत्या एक बाळाला त्यांचे Cousins रुपी घरातील भावंडाचे (Sibling) प्रेम कायम राहो हीच सदिच्छा....

*

## निवडणूक

आली आली निवडणूक आली अन् लोकशाहीला नवी खुमारी आली
पटावरच्या वगनाट्यातील पात्रे नवीन सोंगे रंगवू लागली.
रंगारींना काम मिळाले. छापखाने खटखट करू लागले.
पक्षाच्या या ठेकेदारांनी जुन्या चौकटीवर नवीन बोर्ड लावले.
काहींनी सभ्यतेचा आव आणला, काहींनी श्रेष्ठाचे सोंग घेतले
काही मात्र शिवराळ भाषेत, रस्त्यावर गुंडगिरी करू लागले.
सामान्यजन या लोकशाहीत, आपापली भूमिका वठवू लागले.
गाडीच्या गर्दीत धक्के खात, तावातावाने मते मांडू लागले.
उफाळलेल्या चहाच्या पेल्याबरोबर, वाद संवाद घडू लागले.
नाक्यावरच्या बोर्डाच्या जागी, पिचकाऱ्यांचे रंगही सजले
सर्व पक्षांचे नेते जोशात पोकळ भाषणे देऊ लागले.
गरीब केवळ उदरभरणासाठी, विकलेल्या माना डोलावू लागले.
अंबानीसारखे धनपती मात्र व्यापारी अंदाज घेऊ लागले.
काळ्या पैशाच्या थैल्या सोपवून नेत्यांची तिकीटे खरेदू लागले.
या लोकशाहीच्या नावाखाली आज, बरबटलेली हुकूमशाही नांदत आहे.
धर्म, जात, भाषेसाठी सर्व मतांचा जोगवा मागत आहेत.
तेव्हा आता आपण सुजनहो विचार करूया निकोप मतदानाचा
नव हिंदुस्थानच्या निर्मितीस्तव, हक्क जपू या विश्वासाचा

**-हेमंत विनायकराव तळपदे**
(९८२१६०७५९३)

## पाठारे प्रभु महिला समाज

✶ पाठारे प्रभु महिला समाजाच्या कोजागिरीच्या चांदण्यातील मुंबई दर्शनच्या सहलीला भगिनींनी उत्तम प्रतिसाद दिला.

✶ गुरुवार दिनांक २० ऑक्टोबर २०१६ पाठारे प्रभु महिला समाजातर्फे समाजाच्या ठाकुरद्वार येथील शिवण वर्गात सायंकाळी ४ वाजता दिवाळीनिमित्त गरजू भगिनींना लुगडी, ड्रेस मटेरिअल, लाडू व प्रत्येकीस रु. ९००/- आणि कॉफी अशी दिवाळी भेट समाजाकडून अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांच्या हस्ते देण्यात आली. तसेच विश्वस्त श्रीमती वृंदा जयकर यांनी प्रत्येक भगिनीला कै. शाम जयकर स्मरणार्थ रु. १००/-, सौ. निकेता व प्रशांत राणे कडून कै. डॉ. पुष्पा मोहनलाल राणे स्मरणार्थ प्रत्येकी रु. १५०/- आणि सौ. नीशा राणे जाधवकडून कै. नंदलाल खंडेराव स्मरणार्थ व कै. श्रीमती कुंदा आनंदराव अजिंक्य स्मरणार्थ प्रत्येकी रु. २००/- अशा रकमांचे ४० भगिनींना वितरण केले. तसेच या दिवाळी भेटीसाठी सौ. माधुरी उदय कीर्तिकरकडून रु. १०००/-, डॉ. सुनंदा नितीश कीर्तिकरकडून रु. ५००/- सौ. वर्तिका आशीष कीर्तिकरकडून रु. ५००/-, सौ. योगिता चंद्रकिरण नवलकर कडून कै. श्रीमती चंद्रसेना व कै. श्री. चंद्रकांत आनंदराव नवलकर स्मरणार्थ, रु. २५००/-, सौ. शोभा नंदकुमार धैर्यवानकडून कै. श्रीमती लक्ष्मी माधव प्रभाकर स्मरणार्थ रु. १०००/-, श्रीमती मीनाक्षी शिवनाथ देसाईकडून रु. २०००/-ची देणगी आली.

✶ शनिवार दि. २२ ऑक्टोबर २०१६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्र सभागृहात खार (प.) येथे गरबा कार्यक्रम डॉ. सौ. मीना शाम देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा झाला. सौ. मयुरा गुंजारव नायक यांच्या नृत्य दिग्दर्शनाखाली सौ. अनिला विराग धैर्यवान, डॉ. सौ. निवेदिता धैर्यवान सत्तूर, सौ. संजना दीपक कोठारे, सौ. जान्हवी रितेश कीर्तिकर, सौ. श्वेता असित तळपदे, सौ. अदिती अमित तळपदे, सौ. पूजा मंदार कोठारे, सौ. मिहीका मिथिल नवलकर, सौ. पल्लवी परेश कोठारे व स्वत: सौ. मयुरा गुंजारव नायक यांनी नेत्रदीपक गरबा सादर केला. महिला समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. मीना शाम देसाई यांचा परिचय करून दिला व त्यांना भेटवस्तू व मिठाई देऊन सन्मानित केले. उपस्थित असलेल्या लहान मुलांना भेटवस्तू व चॉकलेट्स देण्यात आली. डॉ. सौ. मीना शाम देसाई यांच्या हस्ते गरब्यात भाग घेतलेल्या भगिनींना महिला समाजातर्फे भेटवस्तू देण्यात आल्या. त्या दिवशी घेण्यात आलेल्या पाकसिद्धी स्पर्धेत पुढील भगिनींना पारितोषिके मिळाली.

विषय : बिरवणीसह शिंगड्या बनविणे
१ ला क्रमांक : डॉ. कु. वैशाली नारायण अजिंक्य
२ रा क्रमांक : सौ. कल्पना उल्हास कोठारे
३ रा क्रमांक : विभागून - सौ. श्रुता आनंद तळपदे आणि सौ. सुजाता रामनाथ कोठारे

विषय: (मुलींसाठी) चायनीज भेळ

यात एकच स्पर्धक असल्याने कु. प्रणाली राकेश राणे हिला 'समाजप्राइज' जाहीर झाले.

परीक्षक म्हणून वंदना प्रमोद नवलकर आणि वृंदा शाम जयकर यांनी काम केले.

✶ पाठारे प्रभु महिला समाजातर्फे दि. २८ ऑगस्ट २०१६ रोजी घेण्यात आलेल्या निबंध व काव्यस्पर्धेत पुढील भगिनींना पारितोषिके मिळाली.

निबंध - माझी अविस्मरणीय सहल
प्रथम क्रमांक : सौ. जयमती जयपाल तळपदे
२ रा क्रमांक : सौ. गीता धराधर आंबवणे
३ रा क्रमांक : सौ. सुचित्रा सचिन कोठारे
काव्य : पूनवेची रात
१ ला क्रमांक : सौ. गीता धराधर आंबवणे
२ रा क्रमांक : सौ. जयमती जयपाल तळपदे
३ रा क्रमांक : सौ. रजनी नितीन कोठारे
निबंध स्पर्धा - १५ वर्षाखालील मुलींसाठी
My most memorable trip
प्रथम क्रमांक - कुमारी आदिती आशीष व्यवहारकर
द्वितीय क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे

वरील सर्व स्पर्धांचे परीक्षण प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी केले आणि आपले मत लिहून सादर केले.

✶ रविवार दि. ८ जानेवारी २०१७ रोजी महिला समाजातर्फे दरवर्षीप्रमाणे खारच्या पा. प्र. को. ऑप. हा. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत भव्य आनंद मेळावा भरविण्यात येणार आहे. मेळाव्याचे उद्घाटन सकाळी ११ वाजता प्रमुख पाहुणे आमदार ॲड. श्री. आशिष शेलार (मुंबई भा.ज.पा. पक्षाध्यक्ष), व श्रीमती अलका केरकर (उपमहापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका) यांच्या हस्ते होणार आहे. तरी पुरुष व स्त्री उद्योजकांनी स्टॉल्ससाठी आपली नावे त्वरित रु. ५००/- भरून अध्यक्षा सौ. नीता सेंजित (मो. नं. ९८२०१६६६२८), उपाध्यक्षा सौ. साया नवलकर (मो. नं. ९८२१३००३९९), चिटणीस सौ. पल्लवी कोठारे (मो. नं. ९८६७६६७७८९), सौ. नूतन कीर्तिकर (मो. नं. ९६१९९६८१३१), सौ. रश्मा विजयकर (मो. नं. ९८२०९८१८८२) यांच्याकडे दि. ११ डिसेंबर २०१६ पर्यंत नोंदवावीत.

✶ समाजातर्फे सालाबादप्रमाणे दि. २०, २१, २२ जानेवारी (शुक्रवार, शनिवार, रविवार) २०१७ रोजी 'श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवे आगर' येथे राहण्याची सहल आयोजित केली आहे. शुल्क रु. ७०००/- (सात हजार रु.) आकारण्यात येईल. तरी इच्छूक भगिनींनी आपली नावे त्वरित प्रवेश शुल्कासह पा. प्र. म. समाजाच्या अध्यक्षा, उपाध्यक्षा, चिटणीस व सहल आयोजक सौ. बिंबा नायक (मो. नं. ९८३३१२१८८४) यांच्याकडे नोंदवून अधिक तपशीलासाठी विचारणा करावी. आणि दि. ११ डिसेंबर २०१६ पर्यंत सहलीचे पैसे भरावेत ही विनंती.

✶ महिला समाजाचा १०२वा स्थापनादिन दिनांक १८ सप्टेंबर २०१६ रोजी दामोदर हॉल परळ येथे थाटात साजरा झाला. प्रसिद्ध कथ्थक नृत्यदिग्दर्शक श्री. मयूर वैद्य यांचा 'समा एक महफिल' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरवात झाली. महिला समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी प्रमुख पाहुण्या सौ. जयश्री टी कर्नाटकी यांचा परिचय करून दिला. मयूर वैद्य यांना फुलाची परडी, मिठाई, ट्रॉफी, शेला, उपरणे देऊन सन्मानित केले. सौ. नीता सेंजितनीसुद्धा भेटवस्तू दिली. नृत्यस्पर्धा गायनस्पर्धेच्या भगिनींना ट्रॉफी, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. समाजाच्या सल्लागार सौ. उर्वशी धराधर यांना पुष्पगुच्छ, मिठाई देऊन सन्मानित केले..

# शीला मुकुंद कोठारे

**-सुहासिनी कीर्तिकर**

त्या वयाच्या ९१व्या वर्षी गेल्या. इतकी वर्षे त्यांचा सहवास म्हणजे लाभलेला दुर्मीळ असा योगच. हो! त्या माझ्या मामी. मी त्यांची भाची. लाडकी! आठवताहेत छोट्या गोष्टी, छोटे छोटेसेच प्रसंग. आमच्या शाळेत शिक्षकदिनाला शाळा विद्यार्थीच चालवत. तर अशा एका दिनी मी झाले एका दिवसापुरती शाळेची मुख्याध्यापिका. माझ्या या मामींनी न मागता, सांगता त्यांची साडी मला खास नेसायला दिली. मखमली फुले अंगगत असलेली डाळींबी रंगाची. त्या साडीने मुख्याध्यापकाच्या खुर्चीची शान वाढविली की हो! पुढे शाळा संपली, कॉलेज संपले अन् मी लगेचच एलफिन्स्टन कॉलेजमध्ये शिकवायला लागले. नोकरी करणाऱ्यांसाठी सकाळचे अधिवेशन त्या वर्षी सुरू झाले होते. मामी मंत्रालयात नोकरीला. त्यांचे अनेक सहकारी माझ्या वर्गाला अपुरे शिक्षण पूर्ण करण्यासाठी येत. या त्यांच्याबरोबर मला काय काय पाठवायच्या. कधी मेथीचा रो, कधी सोडेवांग्याची भाजी, कधी स्वत:साठी खरेदी केलेली एखादी उत्तम पिशवी वा पर्स. मला त्या विद्यार्थ्यांकडून हे सारे घेताना इतका संकोच वाटायचा; तर ते म्हणत, 'कोठारेबाई तुमच्याविषयी कौतुकाने खूप सांगतात' शटल वर्कची फुले, लेस करायला त्यांनीच मला शिकवलं होतं. कधी घरी गेलं तर खास परभी पद्धतीचा खाकरा अन मिरचीचं लोणचं त्यांनी खाऊ घातलं. माझी भाषणं, माझं लेखन हा त्यांच्या कौतुकाचा विषय असायचा. मी कॉलेजमधून निवृत्त झाले; पण मला 'पेन्शन' लगेचच चालू झालं नाही. सगळा सरकारी खाक्या. एकदा बोलता बोलता त्यांना ते कळलं. त्यांच्या 'ऑफिसच्या पेन्शनर्स असोसिएशन'चा सेक्रेटरी त्यांच्या परिसरातच राहात होता. त्याला त्यांनी आपणहून गाठलं. झालं माझं काम! वेगवेगळे स्वेटर्सचे नमुने तर त्यांच्याकडे किती किती असत. तेही त्या सर्वांनाच मुक्तहस्ते द्यायच्या/शिकवायच्या. 'प्रभुतरुण' त्यांच्याकडे पोचला की कौतुकाने त्यांचा फोन न चुकता यायचाच. त्या प्रसंगोपात्त अशा इंग्लीश, मराठी कविताही करायच्या. मला त्यांनी त्या सगळ्याच्या सगळ्या दिल्यात. कधी कुणाच्या साठीनिमित्त, कधी स्वत:च्या पंच्याहत्तरीनिमित्त, कधी भावावर, कधी अगदी माझ्यावरही!

या सप्टेंबरच्या अंकात त्यांची 'पिकनिक' कविता मी दिली होती. पण ती त्यांच्या मुलाने - मिलींदने दिली म्हणून! त्यांनी मला सांगितले होते की या छापायच्या नाहीत - 'मी रेडियो ऐकते तशी कविता करते विरंगुळा म्हणून.' पण आता? माझ्याकडे असलेल्या त्यांच्या कविता छापण्यासाठी मिलिंद आतुरच आहे. मी कार्यकारी संपादक असताना विहंगवर आणि माझ्यावर लिहिलेली त्यांची कौतुकभरली कविता इथे देण्याचा मोह नाही आवरू शकत मी. कविता अशी आहे -

प्रभु तरुण अंकाची आतुरतेने वाट पाहत असते
अंक हाती येताच दोन्ही संपादकीय लेख वाचून आनंदीत होते
संपादक विहंग नायक यांची थोरवी काय वर्णावी?
सहसंपादिकेवर आहेच सतत सरस्वतीची साऊली
नाही कधी उणे दुणे दोघांही ठाऊक
गुणवंत विद्यार्थी व श्रेष्ठ व्यक्तींचे करतात कौतुक
म्हणूनच नवीन नवीन कल्पना सुचतात
मग तरुण संपादक 'अतिथी' म्हणून काम करतात
विहंग नायक हे सर्वत्रच असतात नायक
तसेच सुहासिनीचे हास्य हेच आहे तिचे द्योतक

या अशा कविता आता पुढच्या काही अंकात प्रसिद्ध करेनच. माझे 'हास्य' कायम ठेवत त्यांना 'निरोप' देताना अशा त्यांच्या कवितांतूनच त्या भेटत रहातील ना?

✱

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

०७-१०-१६ श्री. योगेश अरुण विजयकर, पुत्र, विरार

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०५-०८-१६ | श्रीमती. अरुणा सुरेश तळपदे, | वय ७३, | वसई (प.) |
| १८-१०-१६ | श्रीमती अपर्णा (कुंदा) सुरेश धैर्यवान, | वय ८१, | बोरीवली |
| २४-१०-१६ | श्री. वसंतकुमार सीताराम सेंजित, | वय ८६, | पुणे |
| २६-१०-१६ | श्रीमती नलिनी भोलानाथ जयकर, | वय ८३, | अंधेरी |
| २७-१०-१६ | श्रीमती शीला रामराव तळपदे, | वय ७५, | राणेवाडी, अंधेरी |
| ३०-१०-१६ | श्रीमती ज्योतीर्मयी नरेन्द्र वैद्य, | वय ८८, | ठाणे |
| ३०-१०-१६ | श्री. नरेंद्र चंद्रसेन गोरक्षकर | | दहिसर |

## प्रभुतरुणास देणगी

✶ अनामिक दात्याकडून प्रभुतरुण दिवाळी अंकास भेट रु. २००१/-

✶ श्री. मुकुंद सदाशिवराव गोरक्षकर यांजकडून प्रभुतरुणास दिवाळी भेट रु. १५००/-

✶ सौ. नीलिमा आणि श्री. सुजन राणे यांजकडून प्रभुतरुणास सप्रेम भेट रु. ५०००/-

✶ कै. माधव बाळाराम केरोबा नायक (१८-११-१९१६ ते १८-११-२०१६) यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कन्या श्रीमती वृंदा शाम जयकर यांजकडून रु. १०००/-

✶ उल्का सुरेश विजयकर यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज रु. ५०१/-

✶ मनीष कमलाकांत कोठारे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५०१/-

✳

## हौशी कलामंदिर

✶ 'हौशी कला'चा वार्षिकोत्सव दिनांक २९-१०-१६ रोजी वांद्र्याच्या रंगशारदा सभागृहात 'तूतू मीमी' या नाटकाच्या प्रयोगाने साजरा झाला. या प्रसंगी सिनीयर व्हाईस प्रेसिडेंट ऑफ पॉलीमर्स रिलायन्स इंडस्ट्रिजचे श्री. उन्मेष नायक प्रमुख पाहुणे होते. नेहमीप्रमाणे नाटकानंतर 'लकी डीप' होतेच. अंधेरीपर्यंत बससेवा उपलब्ध करून देण्यात आल्याने उपस्थितांना या कार्यक्रमाची लज्जत घेता आली. श्री उन्मेष नायक यांनी 'हौशी कला' ला २५,०००/- रुपये देणगी दिली.

✳

## चुकीची दुरुस्ती

'प्रभुतरुण भाऊबीज' या सदरात खालील दुरुस्त मजकूराची कृपया नोंद घ्यावी.

✶ श्री. विहान श्रीनल कोठारे रु. ५००/-

✶ डॉ. सौ. सुमन सुवर्णकार नवलकर रु. २५१/-

✶ श्रीमती यशोदिनी यदुवीर राणे रु.२५०/-

✶ सौ. निलन दीपक धैर्यवान रु. २०१/-

✶ सौ. शोभा रंजन विजयकर रु. १५०/-

✶ श्रीमती उर्मिला विजय धैर्यवान रु. १०२/-

✶ गतांकी मृदुला प्रभुराम जोशी यांच्या लेखासोबत असलेल्या छायाचित्रात बागेश्री परीख या नावाऐवजी कला इतिहासतज्ञ डॉ. देवांगना देसाई असे वाचावे.

✳

## परीक्षेतील सुयश

### अर्ली चाइल्ड केअर एज्युकेशन

कु. यशाली दीपक नवलकर ८१ टक्के

## अभिनंदन

✶ डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर यांच्या 'वजनदार' पुस्तकाला महाराष्ट्र राज्य शासनाचा यशवंत पुरस्कार (रु. ५० हजार) जाहीर झाला. या पुस्तकाला मिळालेला हा तिसरा पुरस्कार. हंस, किस्त्रीम आदी आठ दिवाळी अंकात डॉ.सुमन यांचे लेख, कथा, कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या 'धडपडणारी मुले'ला दत्तात्रय सांडू पुरस्कार लाभला. अभिनंदन.

✶ श्रीमती. वृंदा शाम जयकर यांचा 'आनंदी ज्योतिष' या दिवाळी अंकात 'रेकी'वर लेख प्रसिद्ध झाला.

✶ सौ. श्रेया शैलेंद्र तळपदे या 'वाहतो ही दुर्वांची जुडी' नाटकात 'ताई'ची प्रमुख भूमिका करीत आहेत. 'टी.व्ही.वरही 'बन मस्का' आदी मालिकेत त्यांचा अभिनय प्रेक्षकांना सुखवून जातोय.

✶ नाटक, सिनेमाक्षेत्रात आपल्या अभिनयाचा ठसा उमटवीत श्री. आदिनाथ कोठारे यांनी '१०० दिवस' या मालिकेद्वारे 'टी व्ही'च्या पडद्यावर यशस्वी पदार्पण केले आहे.

✶ न्यूझिलंडमध्ये योगावर्ग सुरू करून गौरी अजिंक्य-शिवलकर यांनी परदेशी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

✶ सुहासिनी कीर्तिकर यांचे चार दिवाळी अंकात लेख प्रसिद्ध झाले.

✶ मृदुला प्रभुराम जोशी या राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकाच्या 'शिवदर्शन' मध्ये काम करत असत. श्यामला वनारसे यांच्या 'नवभारताचे उदयगान' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. छबिलदास सभागृहात 'प्रभुराम स्मरण पारितोषिक वितरण समारंभ' झाला. या प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या होत्या. 'अज्ञातवासी' कवी तथा राजा केळकरांवर त्यांनी इंग्रजीत फार छान लिहिले आहे. आता 'महाराष्ट्राचे शिल्पकार' अंतर्गत त्याचे मराठी भाषांतर महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध होत आहे. त्याच्या 'रीतिपुस्तक' या पॉप्युलरच्या रामदास भटकळांसह लिहिलेल्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा नरहर कुरुंदकर पुरस्कार (१ लाखाचा) जाहीर झाला.

अभिनंदन.

✳

## पाठारे प्रभू चॅरिटीज

दिनांक १३-१०-२०१६ रोजी सुरेश विठ्ठल स्मृती सभागृहात सकाळी साडेअकरा वाजता चॅरिटीजने मान्यवरांच्या उपस्थितीत दिवाळी साजरी केली. या प्रसंगी २३ गरजू बंधू भगिनींना चॅरिटीजतर्फे २०००/- रु. आणि भगिनींना साड्या देण्यात आल्या. श्री. विश्वासराव विजयकर, सौ. हर्षा त्रिलोकेकर, सौ. निर्मल राणे, सौ. नेत्रा विजयकर, कै. खंडेराव राजे ट्रस्ट, सौ. लीना विजयकर, सौ. दुलारी जयकर, श्री. भूपेन्द्र जयकर, श्री. साहील जयकर, श्रीमती वृंदा जयकर, सौ. नीता आणि श्री. नरेन्द्र जयकर, सौ. मेघना आणि श्री. आश्विन नंदकुमार कोठारे, सौ. उल्का विजयकर, डॉ. प्रदीप विजयकर, श्रीमती छाया कोठारे यांनीही या बंधू भगिनींना दिवाळी भेट दिली. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय मानकर आणि इतर विश्वस्तांनी दीप प्रज्ज्वलीत करून कार्यक्रम सुरू झाला. श्री. उदय मानकर, विश्वस्त श्री. राजन जयकर आणि श्री. अजित विजयकर यांनी दीपावली शुभेच्छा दिल्या. सुहासिनी कीर्तिकरांनीही अध्यक्षांच्या विनंतीला मान देऊन शुभेच्छा देऊन चॅरिटीजच्या कार्याचा गौरव केला. तदनंतर भोजनाचा आस्वाद घेऊन सगळ्यांनी दिवाळीचा आनंद साजरा केला.

✶ **पाठारे प्रभू सोशल समाजाचा** 'दीपावली समारंभ' दि. ११-१२-१६ रोजी प्रा. प्र. सोसायटीच्या खार येथील सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ५ वाजता साजरा होईल. प्रमुख पाहुणे असतील श्री. सुदीप नारायण कोठारे. या समारंभात 'शामांग एन्टरटेनमेंट' प्रस्तुत 'स्वरबंदीश' हा हिंदी मराठी गाण्यांचा कार्यक्रम होईल. काव्य विनोदाची रेलचेल असलेल्या या कार्यक्रमात ज्ञातीय बंधुभगिनींनी अवश्य यावे असे आग्रहाचे निमंत्रण समाजाध्यक्षा स्वाती राणे यांनी दिले आहे.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67